दैनिक
आकर्षण
संपादक : विजय सांगळे

वर्ष ६ ▮ अंक ४५ ▮ शनिवार ७ नोव्हेंबर २०२६ ▮ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322



सुट्टीची सूचना

दीपवाली-पाडव्यानिमित्त 'दैनिक आकर्षण' कार्यालयास सोमवार दि.९ नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबर २०२६ रोजी सुट्टी असल्याने या दिवशीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.

दीपवाली-पाडव्यानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!

- संपादक

नानक जनरल स्टोअर्स
गंजबाजार
मो. ९४२०७८८८६७
मार्केटयार्ड
मो : ९६८९७२२३३२
नानक कलर शॉपी
तारकपूर
मो : ९८२२००२८८३
डी.एन.पेन्टस्
सावेडी
मो : ९८५०५३७५५७७
मो : ८७८८६२३७१८
दिवाळी-पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!

तेजस ड्राय क्लीनर्स
मोफत घरपोहोच सेवा
साईनाथ मोरे
9623562694
8626057002
साडी रोलप्रेस, स्ट्रीम प्रेस, कपडे ड्रायक्लिन व इस्तरी करून मिळतील.
भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड पवन नगर महाल जवळ कजबे वस्ती, अहिल्यानगर ४१४००३
मोबाईल -९६२३५६२६९४

GP
जी. पी. फॅशन
• मेन्स • लेडीज
• किड्स वेअर
• सुटींग • शर्टींग
• साडी

साडी फिक्स रेट
रु.1000 पर्यंत खरेदीवर 5% सुट
रु.10,000 पर्यंत खरेदीवर 10% सुट
रु.10,000 च्या पुढील खरेदीवर 15% सुट

भगवान बाबा टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स
आमच्याकडे योग्य दरात गाड्या भाड्याने मिळतील
Switf, Eetiga, innova, 17 seaterA/c I Non A/c
दिवाळी-पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!
All Maharashtra
महेश आव्हाड - ९०६७८८०७७६
डेली सर्व्हिस- अहिल्यानगर ते पुणे

GP
फॅशन
द मल्टी ब्रॅण्ड फॅमिली स्टोअर...
मेन्स वेअर । लेडीज वेअर । किडस् वेअर । सुटिंग । शर्टींग । साडी । एथनिक वेअर ।
VVT टॉवर, भारत पेट्रोल पंपा समोर, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर - ४१४ ००३
7398989824 / 9270856905

दै. आकर्षण निवडक

दुर्योधनी सत्तेच्या खुर्चीचे पाय कापून भीमाशंकर-सह्याद्री परिसरातील वृक्षतोडीचा निषेध!

अहिल्यानगर- भीमाशंकर-सह्याद्री परिसरातील वनसंपदेची होत असलेली कथित वृक्षतोड थांबवून पर्यावरणाचे रक्षण करावे, तसेच लोकाभिमुख आणि कर्तव्यनिष्ठ प्रशासन निर्माण व्हावे, या मागणीसाठी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने शुक्रवारी (दि. ६ नोव्हेंबर) अहिल्यानगर येथील हुतात्मा स्मारकात अनोख्या पद्धतीने 'वनत्रयोदशी' साजरी करण्यात आली. यावेळी वृक्षतोडीला जबाबदार असलेल्या सत्ताप्रवृत्तीचा निषेध करण्यासाठी 'दुर्योधनी सत्तेच्या खुर्ची'चे प्रतीकात्मक पाय कापण्यात आले. तसेच लोकशाहीच्या पंचमहाभूतांचे प्रतीक असलेल्या पाच पणत्यांचे दीपप्रज्वलन करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. प्रत्येक घराच्या अंगणात पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी एक 'रेन गेन बॅटरी' आणि किमान दोन झाडे लावून 'हरित श्रीमंत भारत' घडविण्याचा देशव्यापी संकल्प यावेळी करण्यात आला.या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, वीरबहादूर प्रजापती, अशोक सब्बन, राहुल आढाव, विठ्ठल ठुबे, शाहीर कान्हू सुंबे, पोपट भोसले, आनंदा आढाव, बाळासाहेब पालवे, अशोक भोसले, आसाराम सातपुते, नंदा कुलट, आसाराम बर्डे, विलास बर्डे, हिरामन गायकवाड, बबलू खोसला, दत्तात्रय साबळे आदी सहभागी झाले होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांनी हुतात्मा स्मारकाला पुष्पांजली अर्पण करून देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना अभिवादन केले. त्यानंतर लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, संवैधानिक नैतिकता आणि कायद्याचे राज्य या लोकशाहीच्या पाच मूलभूत मूल्यांचे प्रतीक म्हणून पाच पणत्या प्रज्वलित करण्यात आल्या. लोकशाही ही केवळ सत्तेची व्यवस्था नसून ती जनतेप्रती असलेली जबाबदारी आणि नैतिकतेवर आधारित असली पाहिजे. शासनकर्ते आणि प्रशासनातील प्रत्येक घटकाने या मूल्यांच्या प्रकाशात काम करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.भीमाशंकर-सह्याद्री परिसरातील जलविद्युत प्रकल्पासाठी सुमारे ३०० वर्षे जुन्या वृक्षांसह हजारो झाडांची तोड झाल्याचा आरोप आयोजकांनी केला. वनसंपदा आणि जैवविविधतेचा नाश करणाऱ्या या वृक्षतोडीला जबाबदार असलेल्या सत्ताप्रवृत्तीचा निषेध करण्यासाठी 'दुर्योधनी सत्तेची खुर्ची' हे प्रतीक उभारण्यात आले होते. या खुर्चीचे प्रतीकात्मक पाय कापून सत्तेच्या अहंकाराचा आणि पर्यावरणविरोधी निर्णयप्रक्रियेचा निषेध नोंदविण्यात आला.यावेळी 'दुर्योधन-त्रयोदशीला डिच्चू फत्ते!', 'वृक्षतोड थांबवा, सह्याद्री वाचवा!' आणि 'भीमाशंकर सत्याग्रहाचा विजय असो!' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. जंगलांचे अस्तित्व टिकले तरच पाणी, माती, वन्यजीव आणि मानवी जीवनाचे भवितव्य सुरक्षित राहील. त्यामुळे विकासाच्या नावाखाली निसर्गसंपत्तीचा विनाश होऊ नये, अशी भूमिका कार्यकर्त्यांनी मांडली.

निर्मला बोरा यांचे संथारा व्रतात निधन



अहिल्यानगर- येथील अशोक बन्सीलाल बोरा (मनोराज वाला) यांच्या धर्मपत्नी निर्मला अशोक बोरा यांचे शुक्रवार दि. ६ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.३८ वाजता संथारा व्रतात निधन झाले. त्यांनी प्रबुद्ध विचारक पूज्य आदर्शऋषीजी म.सा. यांच्या मुखारविंदने संथारा घेतला होता. त्या ७१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती अशोक बोरा, २ मुले मनोज व राजेश बोरा, विवाहित मुलगी सुजाता सचिन गांधी, दीर प्रकाश व दिलीप बोरा, पुतणे सीए परेश बोरा, सीए रुपेश बोरा, सुना, नातवंडे रोहित बोरा, श्रृती बोरा, निर्वी बोरा असा मोठा परिवार आहे. त्या अतिशय धार्मिक व सेवाभावी वृत्तीच्या होत्या. त्यांच्यावर रात्री जैन परंपरेनुसार अंत्यसंस्कार करण्यात आले.

सामाजिक कार्याची दखल; ॲड. स्वाती जाधव यांना राज्यस्तरीय 'कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा' पुरस्काराने सन्मानित!



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन (ट्रस्ट) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा सन्मान सोहळा २०२६' मध्ये शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख ॲड. स्वाती राजेंद्र जाधव यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. पुणे येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी कलामंदिर, औंधगाव येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव सोहळा उत्साहात पार पडला.

ॲड. स्वाती राजेंद्र जाधव यांनी सामाजिक क्षेत्रासह राजकीय क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेत विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून आपले कार्य सुरू ठेवले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानामुळे भविष्यात अधिक जोमाने सामाजिक कार्य करण्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

ॲड. स्वाती राजेंद्र जाधव यांनी सामाजिक क्षेत्रासह राजकीय क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेत विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून आपले कार्य सुरू ठेवले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानामुळे भविष्यात अधिक जोमाने सामाजिक कार्य करण्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

या सोहळ्यास महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री सौ. मेघनाताई साकोरे बोर्डीकर, पुणे गुन्हे शाखेच्या अधिकारी तेजस्विनीताई सातपुते, समाजसेविका डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे तसेच मुंबईच्या महापौर सौ. रितुताई राजेश तावडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.

हा पुरस्कार केवळ माझा वैयक्तिक सन्मान नसून, माझ्या प्रत्येक सुख-दुःखात खंबीरपणे साथ देणाऱ्या कुटुंबीयांचा, मित्रपरिवाराचा, सहकाऱ्यांचा आणि हितचिंतकांचा आहे. सर्वांच्या प्रेमामुळे, विश्वासामुळे आणि आशीर्वादामुळेच हा प्रवास शक्य झाला आहे, अशी भावना ॲड. स्वाती जाधव यांनी व्यक्त केली.

या पुरस्कारामुळे ॲड. स्वाती जाधव यांचे अहिल्यानगर जिल्ह्यातून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

पाच टक्के निधीच्या माध्यमातून मिळणाऱ्या किराणा किटमुळे दिव्यांगाची दिवाळी गोड-आ.अक्षय कर्डीले

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– स्थानिक विकास निधीच्या माध्यमातून मिळणारा ५% निधी शेंडी ग्रामपंचायतीने किराणा किटच्या माध्यमातून खर्च केला यामुळे दिव्यांगच्या चेहऱ्यावर हसू निर्माण झाल्याचा आनंद हा काही वेगळा असतो त्याबद्दल नक्कीच शेंडी ग्रामपंचायतीचे मनापासून धन्यवाद देतं आमदार अक्षयदादा कर्डीले यांनी सर्व उपस्थिती कार्यकर्ते यांचे कौतुक केले.

प्रत्येक गावाने आपल्या स्थानिक विकास निधीच्या माध्यमातून मिळणाऱ्या ५ टक्के निधीचा वापर करून गावातील दिव्यांग बंधू व भगिनीं यांना वस्तू स्वरूपात किंवा किराणा स्वरूपात वाटप करून प्रत्येकाच्या जीवनात आनंद देण्याचे काम करावे,तसेच स्व.आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्या माध्यमातून नेहमीच दिव्यांगानां प्राधान्याने लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत होते हे आवर्जून सांगितले.तसेच दिव्यांगाचें असणारे अडचणी व समस्या बाबत,महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.फडणवीस साहेब यांच्या पर्यंत लवकर माडणार आहें.हे यावेळी सांगितले. व सदर उपक्रमाचे कौतुक केले.असें उपक्रम प्रत्येक ग्रामपंचायतीने करून एक वेगळा आदर्श निर्माण करावा अशा आपल्या भाषणात आवर्जून सांगितले.व सर्वांना दिवाळी व पाडव्याच्या निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.

आम्ही सदैव ग्रामपंचायतिच्या माध्यमातून गावातील दिव्यांग बंधू भगिनीं यांना सहकार्य करून प्रत्येक वर्षी निधीचे वाटप करून मदत करत असतो असं शेंडी ग्रामपंचायत सरपंच सौ. प्रयागा लोंढे यांनी सांगितले.

शासन निर्णय २०१६नुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने दिव्यांगसाठी असणारा ५ टक्के निधी खर्च करणे आवश्यक असते,आम्ही वारंवार निवेदनाच्या माध्यमातून पाठपुरावा करत असतो.आमच्या पाठपुराव्याला निश्चितचं काही प्रमाणात यश मिळत असल्याचे समाधान आम्हाला मिळते,आज दिवाळीच्या निमित्त शेंडी गावातील ३२ दिव्यांगाना किराणा वाटप करून एक वेगळा आदर्श निर्माण केल्याचा आनंद वाटतो असें गौरोदगार आपल्या शुभेच्छा पर भाषनातं भाजपा दिव्यांग विकास आघाडी जिल्हा अध्यक्ष वसंत शिंदे सर यांनी काढले, स्व.आमदार कर्डीले साहेब नेहमीच आमच्या दिव्यांग बंधू भगिनीं यांना आपुलकीने मदत करत असत तसेच आमची संजय गांधी निराधार अनुदान पेन्शन रु. २५००/--करण्यासाठी सिहाच वाटा असल्याचें यावेळी शिंदे सर यांनी सांगितले.तसेच आमदार अक्षयदादाही नेहमीच आमच्या दिव्यांगच्या समस्या समजून घेऊन मार्गी लावतात.

आमची आमदार साहेबांनां सर्व दिव्यांगाच्या वतीने विनंती कीं अहिल्यानगर शहराच्या आसपास एक दिव्यांग भवन उभरावे ही आग्रहाची विनंती यावेळी करण्यात आली. नक्कीच लवकरच यां बाबत पाठपुरावा करू असें आश्वासन देण्यात आले. यावेळी शेंडी ग्रामपंचायत सरपंच प्रयागा लोंढे, ग्रामपंचायत सदस्य सुनिल देठे, रमेशभाऊ देठे,माजी ग्रामपंचायत सदस्य अविनाश शिंदे,एकनाथ शिंदे,गावातील सर्वच दिव्यांग बंधू भगिनीं उपस्थिती होते.

सावेडीकरांसाठी आता दिवाळी अंकाची मेजवानी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दीपावली ची सगळीकडे धूम असताना नगर शहरातील सावेडी उपनगरातील रसिक वाचक नगरकरांना ही दिवाळी आगळीवेगळी ठरणार आहे. दिवाळीचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या जॉगिंग ट्रॅक जवळील सावेडी शाखेमध्ये दिवाळी अंकांच्या माध्यमातून आगळी वेगळी मेजवानी उपलब्ध करून देण्यात आली आहे .या दिवाळी अंकांचे वाचकांना वितरण उद्योजिका शिवानी देशमुख व स्मिता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. ठाकूर ,संचालिका प्रा ज्योती कुलकर्णी, संचालक कवी चंद्रकांत पालवे, सौ गौरी जोशी, वाचक डॉ. धर्माधिकारी, अजित कटारिया ग्रंथपाल अमोल इथापे, सौ सारिका देव आदी उपस्थित होते .

उद्योजिका देशमुख यांनी यावेळी बोलताना ''मराठी संस्कृतीत दिवाळी अंकाचे मोठे योगदान असून सावेडी मधील वाचकांची दिवाळी या उपक्रमामुळे अधिक दैदिप्यमान होणार असल्याचे सांगितले.

डॉ. राजा ठाकूर यांनी याप्रसंगी बोलताना ''विचारांची संस्काराची आणि आत्मिक आनंदातून साजरी करण्यासाठी दिवाळी अंकांचे योगदान अमूल्य आहे. रसिक वाचकांना या दिवाळी अंकामुळे आगळीवेगळी मेजवानी मिळणार असल्याचे ते म्हणाले.प्रास्ताविकात प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी उपक्रमाची माहिती देऊन सावेडी जिल्हा वाचनालयात दीपावली निमित्त विनोदी, क्रीडा,पाककृती, कथा ,विज्ञान ,धार्मिक, बालकथा, फॅशन ,भविष्य तसेच सर्व वृत्तपत्रांचे दिवाळी अंक उपलब्ध असून त्याचा वाचकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले .यावेळी सौ स्मिता देशमुख, सौ गौरी जोशी,कवी चंद्रकांत पालवे ,डॉ. धर्माधिकारी ,अजित कटारिया यांनी आपली मनोगते व्यक्त केली. मान्यवरांचा सन्मान प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी केला तर आभार ग्रंथपाल अमोल इथापे यांनी मानले. यावेळी रसिक वाचक सभासद व वाचनालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

शेतमजूर व पशुधनासाठी तातडीने मदत द्या - दळवी

शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांना दिले निवेदन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– अहिल्यानगर जिल्ह्यात यंदा अत्यल्प पर्जन्यमानामुळे जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसमोर गंभीर दुष्काळी संकट उभे राहिले आहे. पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, रब्बी हंगामही धोक्यात आला आहे. अनेक भागांत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून, जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अशा परिस्थितीत शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, त्याच्यासमोर कुटुंबाचा उदरनिर्वाह, शेतीचा खर्च आणि जनावरांचे संगोपन करण्याचे मोठे आव्हान उभे आहे. जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. पिकांचे नुकसान, घटलेले उत्पादन, वाढता कर्जाचा बोजा, हाताला काम नसल्याने शेतमजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. दुसरीकडे चारा टंचाईमुळे पशुधन जगविणेही कठीण होत आहे. दुष्काळाच्या या संकटात शासनाकडून मिळणारी मदत अपुरी आणि विलंबाने मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आपणास विनंती आहे की, अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला तातडीने दिलासा मिळवून देण्यासाठी शासनाकडे ठोस भूमिका मांडून खालील मागण्यांसाठी पाठपुरावा करावा.

असे निवेदन जिल्हा प्रमुख राजेंद्र दळवी दिले

आमच्या प्रमुख मागण्याः

अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थितीचा विचार करून सरसकट दुष्काळी उपाययोजना लागू कराव्यात. खरीप व रब्बी पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने भरीव आर्थिक मदत द्यावी. नुकसानभरपाई हेक्टरी किमान ५० हजार रुपये देण्यात यावी. शेतकऱ्यांचे पीककर्ज, मध्यम मुदतीचे व दीर्घ मुदतीचे कर्ज पुनर्गठित करून कर्जवसुलीला तात्पुरती स्थगिती द्यावी.

दिवाळीचा खरा प्रकाश माणुसकीतून! वंचितांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवून जेएसएस गुरुकुलने जपले संस्कारांचे दीप!

। आरणगावच्या मानव सेवा प्रकल्पात विद्यार्थ्यांची अनोखी दिवाळी; किराणा, कपडे, अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

। सामाजिक बांधिलकीचा नवा संस्कार; शाळेतील 'वन नाईट स्टे' उपक्रमानेही विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांची रोषणाई, फटाक्यांचा आनंद आणि नवीन कपड्यांची खरेदी नव्हे, तर आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याचा आणि माणुसकीचा प्रकाश सर्वत्र पसरविण्याचा सण आहे. हाच दिवाळीचा खरा अर्थ कृतीतून जपत केडगाव येथील जेएसएस गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी आरणगाव येथील मानव सेवा प्रकल्पातील वंचितांसोबत दिवाळी साजरी केली. विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत किराणा साहित्य, कपडे, अन्नधान्य, साफसफाईचे साहित्य तसेच दैनंदिन वापरातील विविध जीवनावश्यक वस्तू भेट देत गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलविला. प्राचार्य आनंद कटारिया आणि निकिता कटारिया यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ मदतकार्य न ठरता माणुसकी, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीचे संस्कार देणारा अनुभव ठरला.

दिवाळीच्या सणाचा आनंद प्रत्येकाला मिळावा आणि समाजातील वंचित घटकांनाही सणाचा गोडवा अनुभवता यावा, या उद्देशाने जेएसएस गुरुकुलच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्राचार्य आनंद कटारिया यांनी विद्यार्थ्यांना आपापल्या घरून शक्य होईल त्या स्वरूपात मदत घेऊन येण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सामाजिक जाणिवेचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमतेनुसार विविध वस्तू गोळा केल्या. काही विद्यार्थ्यांनी किराणा साहित्य, काहींनी कपडे, तर काहींनी साफसफाईसाठी लागणारे साहित्य आणले. याशिवाय अन्नधान्य आणि दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या वस्तूंचाही समावेश करण्यात आला. एकत्रितपणे जमा केलेले हे साहित्य मानव सेवा प्रकल्पातील गरजूंसाठी भेट देण्यात आले.

मानव सेवा प्रकल्पाला भेट दिल्यानंतर विद्यार्थ्यांना तेथील वंचितांची परिस्थिती, त्यांचे संगोपन, दैनंदिन गरजा आणि प्रकल्पाच्या माध्यमातून त्यांची घेतली जाणारी काळजी याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. समाजातील गरजू घटकांसाठी कोणत्या प्रकारे सेवा आणि मदतकार्य केले जाते, याची प्रत्यक्ष माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन समाजातील वास्तव परिस्थिती समजून घेण्याची संधी या भेटीमुळे विद्यार्थ्यांना मिळाली.

प्रकल्पाचे कार्य आणि तेथील वंचितांची परिस्थिती जाणून घेताना अनेक विद्यार्थी भावूक झाले. आपल्या आजूबाजूला अनेक जण विविध अडचणींना सामोरे जात असतात, त्यांना मदतीचा हात देणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली. दिवाळीचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता गरजूंच्या जीवनातही आनंदाचे क्षण निर्माण करण्याची प्रेरणा या उपक्रमातून मिळाली.

विशेष म्हणजे, या भेटीनंतर विद्यार्थ्यांनी केवळ दिवाळीपुरतेच मदतकार्य मर्यादित न ठेवता यापुढे आपले वाढदिवस आणि जीवनातील विविध आनंदाचे प्रसंगही मानव सेवा प्रकल्पातील वंचितांसोबत सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरे करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या उपक्रमाबद्दल मानव सेवा प्रकल्पाच्या वतीने जेएसएस गुरुकुलचे प्राचार्य आनंद कटारिया आणि निकिता कटारिया यांचे विशेष कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देणे पुरेसे नसून त्यांच्यामध्ये माणुसकी, संवेदनशीलता, सहकार्य, सामाजिक बांधिलकी आणि गरजूंबद्दल आपुलकीची भावना निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. जेएसएस गुरुकुलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच असे संस्कार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होत असल्याची भावना प्रकल्पाचे जाधव यांनी व्यक्त केली.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबत सामाजिक परिस्थितीचे भान ठेवणे आवश्यक आहे. समाजातील विविध घटकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांच्यासाठी आपल्या परीने योगदान देण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली, तर भविष्यात संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडण्यास मदत होईल. याच विचारातून गुरुकुलने राबविलेला असल्याचे प्राचार्य आनंद कटारिया यांनी सांगितले.

'वन नाईट स्टे'मधून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित!

दिवाळीच्या सुट्ट्या सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांसाठी शाळेतच एकत्रित 'वन नाईट स्टे' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील नेहमीच्या शैक्षणिक वातावरणापेक्षा वेगळा अनुभव देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थ्यांना मित्र-मैत्रिणींसोबत वेळ घालविण्याची, एकत्रित राहण्याची आणि विविध आनंददायी क्षण अनुभवण्याची संधी मिळाली. शाळेतच मुक्काम करण्याच्या या अनोख्या अनुभवामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह आणि आनंद द्विगुणित झाला. एकीकडे वंचितांसोबत दिवाळी साजरी करून सामाजिक बांधिलकीचे संस्कार रुजविणे, तर दुसरीकडे 'वन नाईट स्टे'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आनंददायी सामूहिक अनुभव देणे, अशा दुहेरी स्वरूपाच्या उपक्रमांमुळे जेएसएस गुरुकुलमधील दिवाळी विशेष ठरली.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा
फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

फटाक्यांचा धूर नको; निसर्गाचा श्वास जपूया!

अहिल्यानगर - फटाक्यांचा धूर, ध्वनिप्रदूषण आणि पर्यावरणाची हानी टाळून निसर्गपूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश देत निमगाव वाघा (ता. नगर) येथे फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली. शहीद जवान गोरख नाना जाधव यांच्या स्मारकस्थळी हा पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम उत्साहात पार पडला. सध्या परिसरात दुष्काळाचे सावट असून पाणीटंचाईची समस्या गंभीर बनत आहे. त्यातच वाढते वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. सण-उत्सव साजरे करताना निसर्गाचेही भान ठेवणे काळाची गरज बनली आहे. दिवाळीचा आनंद फटाक्यांच्या आवाजात नव्हे, तर दिव्यांच्या प्रकाशात, आपुलकीत आणि सामाजिक बांधिलकीत शोधला पाहिजे, हा विचार या उपक्रमातून मांडण्यात आला.संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी उपस्थित ग्रामस्थांना फटाकेमुक्तीची शपथ दिली. फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच पशुपक्ष्यांना होणारा त्रास टाळण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने दिवाळी साजरी करावी, असे आवाहन करण्यात आले. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हा संदेश यावेळी देण्यात आला.

वालुंबा नदीपात्रात अवैध वाळू उपशाचा आरोप

अहिल्यानगर- अहिल्यानगर तालुक्यातील मौजे भोरवाडी शिव ते खडकी शिवदरम्यानच्या सुमारे नऊ किलोमीटर परिसरातील वालुंबा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची महसूल विभागामार्फत तातडीने चौकशी करून प्रत्यक्ष स्थळपाहणी व पंचनामा करावा, तसेच दोषींवर दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी तसेच राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी निवेदन पाठविले आहे. समितीने दिलेल्या निवेदनानुसार, मौजे भोरवाडी शिव ते जाधववाडी-अकोळनेर परिसरापर्यंतच्या वालुंबा नदीपात्रात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा आणि वाळू तस्करी सुरू असल्याचा आरोप आहे. जेसीबी मशीन आणि अनेक डंपरच्या सहाय्याने नदीपात्रात खोलवर मोठमोठे खड्डे खोदून वाळू काढण्यात आली आहे. हा उपसा नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला बाधा पोहोचविणारा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या अनधिकृत उत्खननामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहावर परिणाम होण्याबरोबरच नदीकाठच्या शेतजमिनी, शेतकऱ्यांच्या विहिरी आणि बंधाऱ्यांना धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे समितीने म्हटले आहे. त्यामुळे संबंधित विभागाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने प्रत्यक्ष पाहणी करणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे.

भारतीय जनसंसद शहरात मतदारांसाठी फॉर्म ८ वितरण आणि अर्जसहाय्य मोहीम राबवणार

अहिल्यानगर - ''प्रत्येक पात्र मतदार हा 'आम्ही भारताचे लोक' या घटनात्मक संकल्पनेचा भाग आहे. पत्ता बदलला किंवा संगणकीय व्यवस्थेत अडचण आली म्हणून त्याला प्रतिनिधी निवडण्याच्या प्रक्रियेबाहेर ठेवता येणार नाही,'' अशी भूमिका पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेने मांडली आहे. पत्ता बदललेल्या विद्यमान मतदारांना मदत करण्यासाठी दोन्ही संघटना फॉर्म ८ वितरण आणि अर्जसहाय्य मोहीम राबवणार असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली. तर निवडणूक प्रशासनातील कथित मनमानीच्या निषेधार्थ अहिल्यानगरच्या दिल्लीगेट येथे उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत गुढीसोबत उभारण्याचे जाहीर केले आहे.मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने परेश साळगावकर व इतर विरुद्ध गोवा राज्य व इतर, रिट याचिका क्र. ७३२/२०२६; तटस्थ संदर्भ २०२६:-:२३६६-, या प्रकरणात ५ नोव्हेंबर २०२६ रोजी निर्णय दिला.

सुजित झावरे पाटील यांच्या संकल्पनेतून देवकृपा फाउंडेशनचा गोसेवेचा अनोखा उपक्रम; दोन गोशाळांना चारा वाटप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

भाळवणी– दिवाळीच्या पहिल्या दिवशी वसुबारस या सणाचे औचित्य साधून शिवसेना नेते तथा जिल्हा परिषद अहिल्यानगरचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या संकल्पनेतून देवकृपा फाउंडेशनच्या वतीने पारनेर तालुक्यातील दोन गोशाळांमध्ये ६५० हून अधिक गोवंशासाठी चारा वाटप करण्यात आले. शहांजापूर येथील श्री माऊली कृपा गोधाम महातीर्थ (श्री क्षेत्र कवडेश्वर) आणि गटेवाडी येथील रामकृष्ण हरी गोशाळा येथे श्री. झावरे पाटील यांच्या हस्ते हा सामाजिक उपक्रम अत्यंत उत्साहात राबविण्यात आला.

शहांजापूर येथील गोशाळेमध्ये ६५० हून अधिक गोवंश आश्रयाला असून त्यांच्या चाऱ्याची मोठी गरज लक्षात घेऊन देवकृपा फाउंडेशनच्या माध्यमातून वेळेवर चारा उपलब्ध करून देण्यात आला. तसेच गटेवाडी येथील रामकृष्ण हरी गोशाळेतील मुक्या जनावरांनाही चारा वाटप करण्यात आले. वसुबारस हा गोमातेच्या पूजनाचा आणि तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा पवित्र सण असल्याने, या दिवशी गोसेवेचा वसा हाती घेऊन एक आदर्श उपक्रम पार पाडण्यात आला. यावेळी बोलताना सुजित झावरे पाटील म्हणाले, ''भारतीय संस्कृतीमध्ये गाईला मातेचे स्थान दिले गेले आहे. वसुबारस हा केवळ गोपूजनाचा सण नसून मुक्या प्राण्यांप्रती आपली कृतज्ञता आणि संवेदनशीलता व्यक्त करण्याचा दिवस आहे. गोशाळांमध्ये अनेक निराधार आणि आजारी जनावरांची निस्वार्थ सेवा केली जाते. अशा मुक्या जनावरांना चारा उपलब्ध करून देणे ही आपली सर्वांची नैतिक सामाजिक जबाबदारी आहे. सण-उत्सव साजरे करताना आपण समाजातील घटकांसोबतच मुक्या जीवांचीही काळजी घेतली पाहिजे. देवकृपा फाउंडेशनच्या माध्यमातून भविष्यातही अशा सेवाभावी उपक्रमांना सातत्याने प्राधान्य दिले जाईल. गोसेवा हीच ईश्वरसेवा या भावनेतूनच हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.''

कार्यक्रमप्रसंगी रामकृष्ण हरी गोशाळेचे नवनाथ महाराज गट, योगेश रोकडे, अण्णा मोटे, अनिल वाबळे, बाबा गाडेकर, शंकर साळुंके, संतोष गाडे, किशोर वाबळे, वैभव काळे, धनंजय शेलार, प्रवीण मापारी,नितीन महाराज शिंदे, प्रमोद महाराज गवळी, सचिन महाराज शिंदे, नामदेव म्हस्के, डॉ. अमोल टकले, भाऊ टकले, धनंजय शेलार, संतोष मापारी, दत्तू शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. वसुबारसच्या निमित्ताने देवकृपा फाउंडेशनने राबविलेल्या या आगळ्यावेगळ्या गोसेवा उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.

शांतीदूत ड्रेसेसची सुवर्ण महोत्सवी वाटचाल कौतुकास्पद – आनंद मुथा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– नगरच्या कापड बाजारातील सुप्रसिद्ध शांतीदूत ड्रेसेस या कापड दालनास यंदा धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. सुवर्णमहोत्सवी वाटचाल करत नगरच्या कापड विश्वाचा नावलौकिक वाढवण्यात शांतीदूत ड्रेसेसने योगदान दिले आहे. या निमित्त दालनाचे संचालक पेमराज पोखरणा यांचा एम.जी.रोड कापड बाजार व्यापारी असोसिएशनतर्फे सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी अध्यक्ष शाम देडगांवकर, सेक्रेटरी किरण व्होरा, संचालक आनंद मुथा, राजेश तिवारी, येवलेकर आदी उपस्थित होते.

आनंद मुथा म्हणाले, नगरचा कापड बाजार चांगल्या दर्जाच्या कपड्यांसाठी महाराष्ट्रात नावाजला जातो. पोखरणा परिवाराने शांतीदूत ड्रेसेसच्या माध्यमातून लहान मुलांमुलींचे रेडिमेड कपडे उपलब्ध करून देत विश्वसनीयता आणि गुणवत्ता जपली आहे. हाच भक्कम पाया पाच दशकांच्या यशस्वी व्यवसायिक वाटचालीचा मुख्य आधारस्तंभ आहे. काळानुरूप बदल अंगिकारत लहानग्यांना आधुनिक फॅशनचे व पारंपरिक कपडे याठिकाणी कायम उपलब्ध करून दिले जातात. त्यामुळे तीन पिढ्यांचे ग्राहक शांतीदूत नी जोडले गेले आहेत. पोखरणा यांची नवीन पिढीही तितक्याच सचोटीने व्यवसाय करत ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देत आहे. अशा वस्त्र दालनांमुळेच नगरचा कापड बाजार आपला नावलौकिक कायम वाढत आहे. मागील काही महिन्यात आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकाराने कापड बाजार रस्त्याचे रूप पालटले आहे.

चला यंदाची दिवाळी प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक साजरी करूया

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर निसर्ग, जैवविविधता आणि पशुपक्ष्यांच्या संरक्षणाचा संकल्प करूया; फटाक्यांचा धूर, आवाज टाळून संवेदनशीलतेने सण साजरा करण्याची काळाची गरज



दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा, उत्साहाचा आणि मांगल्याचा सण! अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि अज्ञानावर ज्ञानाचा विजय साजरा करणारा हा दीपोत्सव भारतीय संस्कृतीमध्ये विशेष महत्त्वाचा मानला जातो. घराघरांत लावले जाणारे दिवे, आकाशकंदील, रांगोळ्या, फराळ आणि आप्तस्वकीयांच्या भेटीगाठी यामुळे दिवाळीचा आनंद द्विगुणित होतो. मात्र, बदलत्या काळात दिवाळी साजरी करण्याच्या पद्धतीतही सकारात्मक बदल होण्याची आवश्यकता आहे. विशेषतः यंदाच्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपण ही दिवाळी अत्यंत साधेपणाने, पर्यावरणपूरक आणि निसर्गातील प्रत्येक सजीवाचा विचार करून साजरी करण्याचा संकल्प करणे गरजेचे आहे.

फटाक्यांचा आनंद कोणाच्या वेदनेचे कारण ठरू नये:

दिवाळी म्हटले की फटाक्यांची आतषबाजी, मोठा आवाज आणि रोषणाई यांना अनेक ठिकाणी प्राधान्य दिले जाते. मात्र, फटाक्यांमुळे निर्माण होणारे ध्वनी आणि वायुप्रदूषण मानवी आरोग्याबरोबरच पशुपक्षी आणि इतर सजीवांसाठीही घातक ठरते. विशेषतः कुत्रे, मांजरी, गुरेढोरे यांसारख्या पाळीव प्राण्यांना मोठ्या आवाजाची तीव्र भीती वाटते. अनेक प्राणी घाबरून पळतात, अपघातग्रस्त होतात किंवा तणावाखाली जातात. पक्ष्यांच्या नैसर्गिक वर्तनावरही फटाक्यांच्या आवाजाचा विपरीत परिणाम होतो. रात्रीच्या वेळी अचानक होणाऱ्या मोठ्या आवाजामुळे पक्षी घाबरून घरटी सोडतात, दिशाभूल होऊन इमारतींना किंवा झाडांना धडकू शकतात.

फटाक्यांच्या धुरामुळे हवेतील सूक्ष्म कण, विषारी वायू आणि रासायनिक घटकांचे प्रमाण वाढते. याचा परिणाम श्वसनसंस्था, डोळे आणि पर्यावरणाच्या आरोग्यावर होतो. त्यामुळे आनंद व्यक्त करण्यासाठी फटाक्यांवर खर्च करण्याऐवजी तो पैसा गरजू व्यक्तींना मदत करण्यासाठी, वृक्षारोपणासाठी, पशुपक्ष्यांच्या संवर्धनासाठी आणि पर्यावरण संरक्षणासाठी वापरणे अधिक उचित ठरेल.

दुष्काळात पशुपक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था हाच खरा दीपोत्सव:

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीमुळे मानवाबरोबरच वन्यजीव, पक्षी, पाळीव पशू आणि लहान-मोठ्या जीवांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. नैसर्गिक पाणवठे आटल्यामुळे अनेक पक्षी आणि वन्यजीव मानवी वस्त्यांकडे धाव घेत आहेत. अशा परिस्थितीत दिवाळीच्या निमित्ताने प्रत्येक कुटुंबाने आपल्या घराच्या अंगणात, गच्चीवर, बाल्कनीत किंवा सुरक्षित मोकळ्या जागेत पशुपक्ष्यांसाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी.

पक्ष्यांसाठी मातीची किंवा उथळ भांडी ठेवावीत. त्यामध्ये नियमित स्वच्छ पाणी भरावे आणि भांडी वेळोवेळी स्वच्छ करावीत. शक्य असल्यास सावलीच्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करावी. मुंग्या, फुलपाखरे, मधमाश्या आणि इतर उपयुक्त कीटकांनाही पाण्याचा लाभ मिळेल, अशा सुरक्षित आणि उथळ पाण्याच्या सोयी निर्माण कराव्यात. पाण्याची भांडी मांजर किंवा इतर भक्षकांपासून सुरक्षित अंतरावर ठेवावीत.

यंदाच्या दिवाळीत प्रत्येक घराने एक दिवा स्वतःच्या आनंदासाठी आणि एक दिवा निसर्ग संवर्धनाच्या संकल्पासाठी लावावा. हा संकल्प केवळ प्रतीकात्मक न राहता पशुपक्ष्यांसाठी पाणी, अन्न, निवारा आणि सुरक्षित अधिवास निर्माण करण्याच्या कृतीतून प्रत्यक्षात उतरवावा.

अंधश्रद्धेपेक्षा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि घुबडांचे संरक्षण महत्त्वाचे:

दिवाळीच्या काळात विशेषतः लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने घुबड या पक्ष्याविषयी अनेक गैरसमज आणि अंधश्रद्धा समाजात आढळतात. काही ठिकाणी घुबडाला धनप्राप्ती किंवा शुभ-अशुभ घटनांशी जोडले जाते. या गैरसमजुतीतून घुबडांची शिकार, पकड, तस्करी आणि अवैध व्यापारासारखे गंभीर प्रकार घडण्याची शक्यता असते. घुबड हा निसर्गातील अत्यंत महत्त्वाचा शिकारी पक्षी असून तो उंदीर आणि इतर लहान प्राण्यांची संख्या नियंत्रित ठेवण्यास मदत करतो. त्यामुळे शेती आणि पर्यावरणाच्या दृष्टीने त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

घुबड हा कोणत्याही अंधश्रद्धेचा विषय नसून निसर्गाच्या अन्नसाखळीतील एक महत्त्वाचा घटक आहे. त्याला पकडणे, जखमी करणे, घरट्यांमधून पिल्ले काढणे किंवा त्याचा बळी देणे हे कायद्यानेही दंडनीय आहे. वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ अंतर्गत संरक्षित असलेल्या घुबडांसह इतर वन्य पक्ष्यांचे संरक्षण करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. घुबड दिसल्यास त्याला त्रास न देता सुरक्षितपणे नैसर्गिक अधिवासात राहू द्यावे. कोणत्याही प्रकारची अवैध शिकार किंवा तस्करी निदर्शनास आल्यास त्वरित वनविभागाला माहिती द्यावी. अंधश्रद्धा नष्ट करून वैज्ञानिक दृष्टिकोन आणि निसर्गप्रेमाची भावना समाजात रुजविणे ही काळाची गरज आहे.

प्लास्टिकमुक्त आणि निसर्गस्नेही दिवाळी साजरी करूया..!

दिवाळीच्या खरेदीमध्ये प्लास्टिकच्या सजावटीच्या वस्तू, थर्माकोल, कृत्रिम फुले आणि एकदाच वापरल्या जाणाऱ्या वस्तूंचा वापर शक्यतो टाळावा. त्याऐवजी मातीचे दिवे, नैसर्गिक फुले, कापडी तोरणे, पुनर्वापर करता येणाऱ्या सजावटीच्या वस्तू आणि पर्यावरणपूरक आकाशकंदील वापरावेत. तेलाचे किंवा तुपाचे दिवे लावताना आग लागणार नाही याची काळजी घ्यावी. दिवाळीनंतर निर्माण होणारा कचरा योग्य पद्धतीने संकलित करून त्याची विल्हेवाट लावावी. उरलेले फटाके, प्लास्टिक, कागद आणि रासायनिक कचरा उघड्यावर किंवा जलस्रोतांमध्ये टाकू नये.

दिवाळीच्या निमित्ताने एक तरी देशी वृक्ष लावण्याचा, त्याचे संगोपन करण्याचा आणि परिसरातील जैवविविधतेचे निरीक्षण करण्याचा संकल्प करावा. फुलपाखरे, मधमाश्या, पक्षी आणि इतर परागीभवन करणाऱ्या जीवांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या स्थानिक वनस्पतींची लागवड करावी. त्यामुळे केवळ हरित परिसर निर्माण होणार नाही, तर जैवविविधतेचे संवर्धनही होईल.

सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धन यांचा संगम घडवूया..!

दिवाळी हा केवळ स्वतःच्या घरात आनंद साजरा करण्याचा सण नाही, तर समाजातील वंचित, गरजू, वृद्ध, दिव्यांग, विधवा आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या जीवनात आनंदाचा प्रकाश निर्माण करण्याची संधी आहे. आपण अनावश्यक खर्च टाळून गरजू कुटुंबांना अन्नधान्य, कपडे, शैक्षणिक साहित्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करू शकतो. तसेच स्थानिक पातळीवर वृक्षसंवर्धन, जलसंधारण, पक्ष्यांसाठी पाणपोई, वन्यजीव संरक्षण आणि पर्यावरण जनजागृतीचे उपक्रम राबवू शकतो.

शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, युवक मंडळे आणि ग्रामपंचायतींनी एकत्र येऊन प्रदूषणमुक्त दिवाळी अभियान राबवावे. मुलांमध्ये लहानपणापासूनच पशुपक्ष्यांविषयी प्रेम, निसर्गाविषयी संवेदनशीलता आणि पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण करावी. कारण आज आपण मुलांना पर्यावरण संवर्धनाचे संस्कार दिले, तर उद्याची पिढी अधिक सुरक्षित आणि समृद्ध निसर्ग निर्माण करू शकेल.

एक दिवा निसर्गासाठी, एक संकल्प जैवविविधतेसाठी..!

दिवाळीच्या प्रकाशात केवळ आपली घरे उजळू नयेत, तर निसर्गातील प्रत्येक सजीवाचे जीवनही सुरक्षित आणि समृद्ध व्हावे. फटाक्यांचा आवाज न करता, धूर आणि प्रदूषण न वाढवता, पाण्याची नासाडी टाळून, पशुपक्ष्यांना अन्न-पाणी उपलब्ध करून आणि अंधश्रद्धेला दूर ठेवून आपण खऱ्या अर्थाने दिवाळीचा आनंद साजरा करू शकतो. निसर्गाने आपल्याला हवा, पाणी, अन्न, वनस्पती, वन्यजीव आणि जैवविविधतेची अनमोल संपत्ती दिली आहे. या संपत्तीचे संरक्षण करणे ही केवळ शासनाची किंवा पर्यावरणप्रेमींची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. निसर्गाचे अस्तित्व टिकले, तरच मानवाचे अस्तित्व सुरक्षित राहील, हे आपण विसरता कामा नये.

चला तर मग, यंदाच्या दिवाळीत फटाक्यांऐवजी आनंदाची फुले उधळूया, प्रदूषणाऐवजी स्वच्छतेचा संदेश देऊया, अंधश्रद्धेऐवजी विज्ञाननिष्ठ विचारांचा स्वीकार करूया आणि प्रत्येक सजीवाच्या जीवनाचा आदर करूया.

ही दिवाळी केवळ प्रकाशाची नव्हे, तर निसर्ग संवर्धनाची, जैवविविधतेच्या संरक्षणाची आणि माणुसकीच्या जिव्हाळ्याची दिवाळी बनवूया..!

लेखक: डॉ. रणजित राऊत
(युवा शास्त्रज्ञ व जैवविविधता संशोधक)

'अवॉर्ड फंक्शन'मुळे बांधकाम क्षेत्रातील कामांचा दर्जा सुधारण्यास मदत - आर्कि. महेश बांगड

। आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशनच्या वतीने सभासदांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा
। पुण्यातील तज्ज्ञांनी मानांकित स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक तयारीचे केले मार्गदर्शन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– बांधकाम क्षेत्रातील उत्कृष्ट कामांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या अवॉर्ड फंक्शनमुळे व्यावसायिकांमध्ये कामाचा दर्जा सुधारण्याची प्रेरणा निर्माण होते. अशा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याच्या प्रक्रियेतून आपल्या कामातील त्रुटी आणि वेगळेपण समजण्यास मदत होते. त्यामुळे अवॉर्ड फंक्शनकडे केवळ पुरस्कार मिळविण्याचे माध्यम म्हणून न पाहता बांधकाम क्षेत्रातील कामांचा दर्जा उंचावण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे, असे प्रतिपादन आर्कि. महेश बांगड यांनी केले.

आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगर यांच्या वतीने सभासदांसाठी बांधकाम क्षेत्रातील मानांकित स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक तयारी या विषयावर मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी पुणे एसा संस्थेचे अध्यक्ष आर्कि. शेखर गरूड, आर्कि. हेमंत महाजन, इंजि. मनोज देशमुख, इंजि. आरती भट आणि आर्कि. महेश बांगड यांचे तज्ज्ञ पॅनल निमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संस्था अध्यक्ष प्रदीप तांदळे यांनी सांगितले की, अहिल्यानगरमध्ये अनेक दर्जेदार बांधकामे होतात. मात्र, त्या कामांचे रेकॉर्ड व्यवस्थित जतन केले जात नाहीत. तसेच आपल्या कामांचे प्रभावी सादरीकरण करण्यातही आपण कमी पडतो. अशा कार्यशाळांच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन मिळत असून, त्याचा उपयोग केवळ अवॉर्ड फंक्शनपुरता मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कामाचा दर्जा सुधारण्यासाठी झाला पाहिजे.

पुणे एसा संस्थेचे अध्यक्ष आर्कि. शेखर गरूड यांनी पुणे एसा संस्थेच्या वतीने राबविण्यात येणारे विविध उपक्रम आणि संघटना बळकट होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती सभासदांना दिली. अवॉर्ड फंक्शन आणि मानांकित स्पर्धांचे महत्त्व स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, पुण्यातील प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये संस्थेचे सभासद सहभागी होऊन विजेते ठरत आहेत. त्यामुळे काम करण्याचा उत्साह वाढतो आणि आपण व्यावसायिक क्षेत्रात नेमक्या कोणत्या पातळीवर आहोत, याचा अंदाज घेता येतो.

पुण्यातील प्रथितयश आर्किटेक्ट हेमंत महाजन यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन मिळविलेल्या पुरस्कारांच्या अनुभवातून मार्गदर्शन केले. स्पर्धेसाठी ड्रॉइंग कसे असावेत, काम सुरू असताना त्याचे रेकॉर्ड कशा पद्धतीने जतन करावे, स्पर्धेत सहभाग कसा नोंदवावा आणि त्यासाठी पूर्वतयारी कशी करावी, अशा विविध बाबींवर त्यांनी प्रकाश टाकला. तसेच २००६ पासून केलेल्या आणि विविध स्पर्धांमध्ये विजेते ठरलेल्या कामांचे प्लॅन, छायाचित्रे, प्रेझेंटेशन आणि व्हिडिओ शूटिंग सभासदांना दाखवून प्रत्यक्ष उदाहरणांसह माहिती दिली.

इंजि. मनोज देशमुख यांनी स्पर्धांमध्ये सहभागी होताना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि ज्युरींच्या साइट व्हिजिटसाठी करावयाच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले. वेळोवेळी केलेल्या कामांचे रेकॉर्ड, छायाचित्रे आणि व्हिडिओ शूटिंग व्यवस्थित जतन करून ठेवणे आवश्यक आहे. ज्युरींच्या साइट व्हिजिटच्या वेळी केलेल्या कामांचे रेकॉर्ड आणि टेस्ट रिपोर्ट उपलब्ध असणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

पुण्यातील विविध संस्थांमध्ये पदाधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या तसेच आरसीसी डिझाइन क्षेत्रातील तज्ज्ञ इंजि. आरती भट यांनी आरसीसी डिझाइनमधील बारकावे समजावून सांगितले. आपल्या कामातील वेगळेपण अधोरेखित करणाऱ्या बाबी ज्युरी पॅनलच्या लक्षात कशा आणून द्याव्यात, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. कामासाठी गुड फॉर वर्क प्लॅनचा वापर करावा आणि साइट व्हिजिटच्या वेळीही तेच प्लॅन उपलब्ध ठेवावेत, असे त्यांनी सांगितले. आरएमसी व इतर बाबींचे टेस्ट रिझल्ट रेकॉर्डसाठी जतन करावेत. तसेच आरसीसी डिझाइनर यांचे स्टॅबिलिटी प्रमाणपत्र आणि स्लॅब चेकिंग प्रमाणपत्र तयार ठेवण्याचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले.

आर्कि. महेश बांगड यांनी संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा मांडताना शहरात दर्जेदार बांधकामे उभी राहण्यासाठी अशा स्पर्धांचा कसा उपयोग होतो, याची माहिती दिली. शहराच्या विकासात आणि सुदृढ स्ट्रक्चर उभारण्यात एसा संस्थेची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. अशा उपक्रमांमुळे बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिकांना गुणवत्ता वाढविण्याची प्रेरणा मिळते, असेही ते म्हणाले.

या कार्यशाळेसाठी पोलाद स्टीलचे सुशांत गव्हाणे, आदेश गुंगे, तसेच एसा संस्थेचे दत्तात्रय शेळके, कोमल कुलकर्णी, नंदकिशोर घोडके, प्रल्हाद जोशी, वैभव देशमुख उपस्थित होते. याशिवाय संचालक भूषण पांडव, अनमोल जैन, संतोष खांडेकर, सुनील जाधव, सचिन डागा, संकेत पादिर, गौरव मांडगे, अमोल येनगंदुल, आदिनाथ आंबेकर, सागर ढगे, विजय उजनीमठ आणि संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पर्यावरणाचा विचार न करता केलेल्या विकासामुळे देशाचे टाऊन प्लॅनिंग कोलमडले - पद्मश्री पोपटराव पवार

पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत पर्यावरण संवर्धनासाठी मार्गदर्शन; १५ हजार वृक्षांच्या संगोपनाचे आवाहन । साई द्वारका सेवा ट्रस्ट व अहिल्यानगर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने बैठक संपन्न



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– भारताची मूळ परंपरा निसर्गाशी जोडलेली आहे. मात्र, पर्यावरणाचा कोणताही विचार न करता ओढे-नाले यांमध्ये अतिक्रमणे, नद्यांच्या पूररेषेचे उल्लंघन करून बांधकामे आणि विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वृक्षतोड व जंगलतोड सुरू आहे. त्यामुळे आपल्या देशाचे टाऊन प्लॅनिंग पूर्णपणे कोलमडले आहे, असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत साई द्वारका सेवा ट्रस्ट व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनाच्या विषयावर आयोजित बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, संजय गुगळे, कैलास दिघे, हर्षल आगळे, राजेंद्र पवार, प्रताप काळे, अमोल बागुल, राहुल मुथा आदी उपस्थित होते.

पद्मश्री पोपटराव पवार पुढे म्हणाले की, पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या पुढाकारातून शहरात आतापर्यंत १५ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. मात्र, केवळ वृक्षलागवड करून चालणार नाही, तर दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या काळात लावलेली झाडे कशी जगवायची, याचे योग्य नियोजन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने लावलेले झाड जतन करून त्याला मुलाप्रमाणे सांभाळले पाहिजे. हेच आपल्या पुढील पिढीचे खरे भविष्य आहे.

आपण मुलांच्या भविष्यासाठी त्यांच्या शिक्षणाची आणि नोकरीची स्वप्ने पाहतो. मात्र, पुढील पिढीचे भविष्यच अंधकारमय होणार असेल, तर त्या भविष्याचा विचार करून वृक्षांचे संगोपन करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. असे काम केल्यास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिप्रेत असलेले पर्यावरणपूरक कार्य आपल्या हातून घडेल.

पोपटराव पवार यांनी सातबारा संकल्पनेचा संदर्भ देत वृक्षांचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, ब्रिटिश भारतात आल्यानंतर त्यांनी जमीन महसूल पद्धतीचा अभ्यास केला. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जमीन महसूल पद्धत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या काळातील पद्धत आणि पेशव्यांच्या काळातील महसूल पद्धतीचा अभ्यास करण्यात आला. त्यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या काळात झाडांना पाण्याइतकेच महत्त्व दिले जात होते. बारा झाडे लावायची, त्यापैकी सात झाडांची फळे जमीन मालकाने घ्यायची आणि पाच झाडांची फळे महसूल म्हणून सरकारला द्यायची, अशी पद्धत होती. या संदर्भातून वृक्षांचे आर्थिक आणि पर्यावरणीय महत्त्व स्पष्ट होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने आपल्या अहिल्यानगर शहराची ओळख आहे. त्यामुळे त्यांना अभिप्रेत असलेले पर्यावरणसंतुलित आणि पाणीदार शहर घडविण्यासाठी ॲड. धनंजय जाधव यांनी हाती घेतलेल्या पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे. साईबाबांची प्रेरणा समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी आहे. त्याच भावनेतून साई द्वारका सेवा ट्रस्टचा हा उपक्रम पुढील पिढीच्या भविष्यासाठी उपयुक्त ठरणार आहे, असे त्यांनी सांगितले.

पर्यावरणाचा समतोल बिघडल्यामुळे आज जगभरात सामाजिक आणि विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्यांच्या अनेक कारणांपैकी मोठ्या प्रमाणावरील जंगलतोड हे एक महत्त्वाचे कारण आहे. पर्यावरण हा मतपेटीचा विषय नसून, तो पुढील पिढ्यांच्या अस्तित्वाशी संबंधित विषय आहे. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन पर्यावरण संतुलनासाठी काम करणे आवश्यक आहे.

पुढील काळात निसर्गाचे बदलते स्वरूप आणि चीनसारख्या देशाकडून निर्माण होणाऱ्या मोठ्या धोक्याचाही विचार करावा लागेल. पावसाची अनिश्चितता, वादळे आणि बदलते तापमान यामागे जंगलतोड हे प्रमुख कारण आहे. महाबळेश्वर आणि सिंधुदुर्गसारख्या भागांत दिवसेंदिवस पावसाचे प्रमाण कमी होत आहे, तर ज्या भागांत पूर्वी कमी पाऊस पडत होता, तेथे अवेळी आणि मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. यामुळे पर्यावरण, निसर्ग आणि मनुष्यजीवनाचे मोठे नुकसान होत असल्याचे पवार यांनी नमूद केले.

यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, पालकमंत्री ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत शहरात आतापर्यंत १५ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. दुष्काळाच्या काळात या वृक्षांचे संगोपन व्हावे, यासाठी पाण्याचे नियोजन आणि पर्यावरण संवर्धन या विषयांवर पद्मश्री पोपटराव पवार यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

मनुष्याने निसर्गावर प्रेम करणे आवश्यक आहे. वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असून, दिवसेंदिवस वाढणारे तापमान कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे आणि लावलेल्या वृक्षांचे संगोपन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. पद्मश्री पोपटराव पवार यांचे मार्गदर्शन समाजाला प्रेरणा देणारे असून, त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा आदर्श घेऊन पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

अंध बांधवांसाठी माणुसकीचा हात

अश्विनी आव्हाड यांच्या पुढाकारातून जीवनावश्यक किराणा किटचे वाटप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– समाजातील वंचित गरजू आणि दिव्यांग घटकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हीच खरी समाजसेवा असल्याचे दर्शन घडवत दानशूर समाजसेविका अश्विनी आव्हाड यांच्या पुढाकारातून अंधजन मंडळातील अंध बांधवांना जीवनावश्यक किराणा किटचे वाटप करण्यात आले. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या सेवाभावी उपक्रमाचे शहरभरातून कौतुक होत आहे.

सध्याच्या महागाईच्या काळात अंध आणि दिव्यांग बांधवांना जीवनावश्यक वस्तूंची कमतरता भासू नये, तसेच दिवाळीचा सण आनंदाने साजरा करता यावा या उद्देशाने सुमारे २० ते २५ अंध बांधवांना किराणा किटचे वितरण करण्यात आले. या किटमध्ये गहू, तांदूळ, तेल, डाळी, साखर, चहापत्ती तसेच इतर आवश्यक वस्तूंचा समावेश होता.याप्रसंगी अश्विनी आव्हाड, सुनील मंगुडकर, वैशाली आव्हाड, भारती दरेकर, प्रथमेश मंगुडकर अंधजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर, राजेंद्र फळके, अनिल चाबुकस्वार,गोरख दरंदले,अप्पा फुफसे, गणेश जाधव, छाया धनवटे, मनिषा लोंढे, अनिता जाधव, दृष्टीसाथी मनेष वैराळ, आदी दिव्यांग बांधव उपस्थित होते.

यावेळी बोलताना अश्विनीताई आव्हाड म्हणाल्या, ''दिव्यांग अंध बांधवांना केवळ सहानुभूती नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. सामाजिक बांधिलकी जपत हा छोटासा प्रयत्न केला असून भविष्यातही अशा सेवाभावी उपक्रमांद्वारे गरजूंच्या पाठीशी उभे राहण्याचा आमचा संकल्प आहे.'' कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल चाबुकस्वार यांनी केले, तर आभार प्रदर्शन गोरख दरंदले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अश्विनी आव्हाड व त्यांच्या सहकारी मित्रमंडळाने विशेष परिश्रम घेतले.

यावेळी दानशूर समाजसेविका अश्विनी आव्हाड व भारती दरेकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. अंधजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर यांनी सर्व सेवाभावी दात्यांचे मनःपूर्वक आभार मानत समाजातील अधिकाधिक नागरिकांनी अशा उपक्रमांमध्ये सहभागी होऊन गरजूंना मदतीचा हात द्यावा असे भावनिक आवाहन केले.

बालदोस्तांच्या कल्पकतेला मिळाले व्यासपीठ; 'चला दुकानदार होऊया २०२६' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

पालवी शिशुविहारचा अभिनव उपक्रम; ११० स्टॉल्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी घेतला दुकानदारीचा अनुभव, सहा बालदुकानदारांना 'बेस्ट दुकानदार' पुरस्कार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन, आर्थिक व्यवहारांचे ज्ञान आणि स्वावलंबनाची भावना रुजविण्याच्या उद्देशाने पालवी शिशुविहारच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'चला दुकानदार होऊया २०२६' या अभिनव उपक्रमाला यंदा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाचे यंदा पाचवे वर्ष असून, दरवर्षीपेक्षा अधिक उत्साहात आणि उत्तम प्रतिसादात हा उपक्रम पार पडला. नगर शहरातील विविध शाळांमधील इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी उभारलेल्या तब्बल ११० स्टॉल्समधून विविध वस्तू आणि खाद्यपदार्थांची विक्री करण्यात आली. या माध्यमातून बालदोस्तांनी प्रत्यक्ष दुकानदारीचा अनुभव घेतला.

दिवाळीच्या पूर्वसंध्येला पालवी शिशुविहारचे प्रांगण विविध रंगीबेरंगी वस्तू, आकर्षक सजावट आणि खाद्यपदार्थांच्या दुकानांनी सजले होते. विशेषतः खाऊगल्लीतील पदार्थांच्या सुगंधाने परिसरात चैतन्य निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांनी स्वतः दुकाने थाटून वस्तूंची विक्री केली. यातून त्यांना ग्राहकांशी संवाद साधणे, वस्तूंची किंमत ठरविणे, पैशांचे व्यवहार करणे आणि विक्री व्यवस्थापन यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

या उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काही नियम निश्चित करण्यात आले होते. विक्रीसाठी ठेवण्यात येणाऱ्या वस्तूंची किंमत १०० रुपयांच्या आत असणे आवश्यक होते. सर्व व्यवहार रोखीने करायचे होते. तसेच प्रदूषण करणाऱ्या किंवा निसर्गाची हानी करणाऱ्या वस्तूंच्या विक्रीला परवानगी नव्हती. खाऊगल्लीमध्येही फास्ट फूड, बेकरी पदार्थ आणि शीतपेयांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे पौष्टिक आणि चविष्ट पदार्थांनाही ग्राहकांची पसंती मिळू शकते, तसेच कमी किमतीत विविध वस्तूंची विक्री करता येते, याची जाणीव विद्यार्थी आणि पालकांना झाली. ऑनलाइन पेमेंटच्या काळात ग्राहकांनीही पुन्हा एकदा रोखीने व्यवहार करण्याचा अनुभव घेतला.

उत्तम दुकानदारी करणाऱ्या निवडक सहा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून 'बेस्ट दुकानदार' पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी परीक्षक म्हणून सौ. अश्विनी भालेराव यांनी काम पाहिले. अर्थात, या उपक्रमात सहभागी झालेला प्रत्येक विद्यार्थी आपापल्या परीने सर्वोत्तमच होता.



बालदुकानदारांना व्यवसायाची प्रेरणा मिळावी, यासाठी दरवर्षी उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रातील नामवंत व्यक्तींना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले जाते. यंदा प्रसिद्ध उद्योजक ॲड. जयवंत भापकर, हेमचंद्र इंगळे आणि रमणलाल भंडारी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत प्रोत्साहन दिले. तसेच अमित मुथा, शरद झोटिंग आणि राजेंद्र सोनार यांच्या उपस्थितीने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला.

कार्यक्रमाचे आयोजन पालवी शिशुविहारच्या वतीने करण्यात आले होते. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन कु. श्रुती खिस्ती यांनी केले. प्रास्ताविक सौ. मुग्धा घोटणकर यांनी केले, तर आभार वैद्य अनिकेत घोटणकर यांनी मानले.

व्यवहारापेक्षा अनुभव महत्त्वाचा!

या उपक्रमातून मुलांना केवळ पैसे कमावण्याचा अनुभव मिळत नाही, तर आत्मविश्वास, स्वावलंबन, व्यवहारज्ञान आणि उद्योजकतेचे धडेही मिळतात. किती पैसे कमावले किंवा किती माल विकला गेला, यापेक्षा किती अनुभव मिळाला, हे अधिक महत्त्वाचे आहे. दिवाळीच्या काळात रस्त्यावर पणत्या, आकाशकंदील, रांगोळ्या आणि इतर वस्तू विकणारे छोटे व्यावसायिक ग्राहकांची वाट पाहत असतात. काहींचा सर्व माल विकला जातो, तर काहींचा माल शिल्लक राहतो. अशा वेळी त्यांच्या मनाची होणारी घालमेल विद्यार्थ्यांनाही अनुभवता यावी आणि भविष्यात ऑनलाइन खरेदीऐवजी अशा छोट्या व्यावसायिकांकडून खरेदी करण्याची भावना निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा विचार आहे.

मोहिनी खेडकर हिचे शैक्षणिक यश अभिमानास्पद – बाबुराव कर्डिले

संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना मिळते नवी दिशा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात कर्डिले ब्युरो नर्सिंग होम, यश प्यारा मेडिकल इन्स्टिट्यूट, यश अलाईड आणि शुभ नर्सिंग या संस्थांच्या माध्यमातून अत्यंत उल्लेखनीय कार्य सुरू आहे. गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत त्यांचे भविष्य घडविण्याचे काम या संस्थांच्या माध्यमातून होत आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय बाबुराव कर्डिले आणि सौ. मंगल कर्डिले मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेले हे कार्य कौतुकास्पद आणि प्रेरणादायी असल्याचे मत मोहिनी खेडकर हिच्या पालकांनी व्यक्त केले.

संस्थेच्या ए.डी.एम.एल.टी. () अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये कु. मोहिनी मल्हारी खेडकर हिने शैक्षणिक गुणवत्तेत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल तिचे पालकांनी आनंद व्यक्त करत संस्थेच्या वतीने मिळालेल्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी मोहिनीचे वडिल मल्हारी खेडकर म्हणाले की, मुलीच्या यशामागे तिची मेहनत, जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांचा मोठा वाटा आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या यशामध्ये शिक्षक, प्राचार्य आणि संस्थेच्या व्यवस्थापनाचे योगदानही तितकेच महत्त्वाचे असते. या संस्थेत विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान दिले जात नाही, तर शिस्त, संस्कार, आत्मविश्वास आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणारे मार्गदर्शनही केले जाते. त्यामुळेच विद्यार्थ्यांना आपल्या स्वप्नांना गवसणी घालणे शक्य होत आहे.



संस्थापक अध्यक्ष बाबुराव कर्डिले, सौ. मंगल कर्डिले, प्राचार्य, सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनामुळे मोहिनीला हे यश संपादन करता आले. याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. प्रास्ताविक कोमल पंचमुख यांनी केले.

मोहिनी खेडकर हिने विद्यार्थ्यांना संदेश देताना त्यांनी सांगितले की, प्रत्येक विद्यार्थ्याने आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून गुरुजनांचा सन्मान करावा. मेहनत, प्रामाणिकपणा, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आयुष्यात मोठे यश संपादन करावे. आपल्या यशातून आई-वडील आणि शिक्षकांच्या चेहऱ्यावर अभिमानाचे हास्य फुलवावे. संस्थेच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होत असून, संस्थेची अशीच उत्तरोत्तर प्रगती व्हावी, अशा शुभेच्छाही त्यांनी यावेळी दिल्या.

दिशान गांधी यांचे कॉर्फबॉल आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील यश भूषणावह बाब – वसंत लोढा

पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्या वतीने दिशान गांधी यांचा सत्कार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– देशातील पहिल्याच केपीएल मधील दिल्ली धुरंधर संघाच्या विजेतेपदात सिंहाचा वाटा उचलल्यानंतर लगेचच झालेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशन चषक कॉर्फबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करत विजेतेपद मिळवून देत दिशान गांधी यांनी कॉर्फबॉल खेळात आंतरराष्ट्रीय पातळीवर देदीप्यमान यश मिळवले आहे.त्यामूळे दिशान गांधी हे अहिल्यानगरचे भूषण ठरले आहेत.दिशान गांधी यांची आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरी अहिल्यानगर साठी घोषणा व बाब आहे.असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते तथा पंडित दीनदयाळ परिवाराचे संस्थापक वसंत लोढा यांनी केले. पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय फेडरेशन चषक कॉर्फबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करत



विजेतेपद मिळवून देणाऱ्या दिशान किशोर गांधी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते तथा पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे चेअरमन वसंत लोढा, पंडित दीनदयाळ परिवाराचे अध्यक्ष धनंजय तागडे, सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, मिलिंद कोलते,किशोर गांधी, पतसंस्थेचे संचालक अनंत होशिंग,व्यवस्थापक निलेश लाटे,सहव्यवस्थापक सुखदेव दरेकर,उमेश मेरगु, गणेश जंगम,अजय आडेप आदी उपस्थित होते.

याप्रसंगी गोकुळ काळे यांनी भाषण केले,तर किशोर गांधी यांनी दिशानच्या खेळातील वाटचालीची माहिती दिली.अनंत होशिंग यांनी आभार मानले.